# आनंददायी बालशिक्षणाच्या दिशा

बालशिक्षण हे आनंददायी असावे असे आता जवळपास सर्वांचेच मत आहे. परंतु मुळात बालशिक्षण हे आनंदमयच असते हे आजही फारच थोड्यांना माहीत आहे. ते सर्वांनाच माहीत झाले तर सर्वांचीच लहान बालकांकडे आणि त्यांच्या शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी बदलेल; त्याचबरोबर प्रौढ लोकांची लहान मुलांबाबतची वागणूकही बदलेल. परिणाम असा होईल की भारताची पुढील पिढी अधिक प्रभावी रीतीने शिकून अधिक सक्षम होईल. राष्ट्राचे वैभवही वाढते राहील.

**आनंदमय बालशिक्षण**

बालशिक्षण हे मुलत: आनंदमय असते असे आपण म्हणतो आहोत कारण, बालकांना काहीही नवे शिकणे हे आनंदाचेच वाटत असते. मुलांना शिकण्याची प्रेरणा उपजतच असते. माणसाचा मेंदू हा शिकण्यासाठी सदैव तत्पर असतो. तो सारखे शिकू पाहतो. निसर्गानेच त्याला शिकण्याची प्रेरणा बहाल केलेली असते. शिकण्यासाठी लागणा–या उर्जेचाही भरपूर पुरवठा निसर्ग सातत्याने करीत राहतो. त्यामुळे 'शिकणे' ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे हे आपण ध्यानांत घेतले पाहिजे. एकदा ही गोष्ट नीट लक्षात आली की बालशिक्षणाची सारी दिशाच आपल्याला स्पष्ट होते. आपण आता असे म्हणू लागतो की, शिकण्याची मूळ प्रक्रियाच जर नैसर्गिक असेल तर लहान बालकांचे सारे शिक्षण या नैसर्गिक प्रक्रियेला अनुसरूनच झाले पाहिजे. बालकांसाठीचा सर्वच शिक्षणव्यवहार हा या नैसर्गिकतेला धरून आणि तिला पोषक असाच असला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत, बालकांना शिकविण्याचा घातलेला घाट हा कधीही त्यांच्या शिकण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेला बाधक ठरता कामा नये; घातक ठरता कामा नये.

**वातावरण निर्मिती**

बालशिक्षण म्हणजे, सामान्यपणे, बालकांचा वयाच्या सहाव्या वर्षापर्यंतचा शिक्षणाचा व्यवहार होय. ह्या व्यवहाराची दोन वैशिष्टये लक्षात घेता येतील. एक म्हणजे, बालकाचे निसर्गदत्त असे स्वत:हून शिकणे आणि दुसरे म्हणजे, हे शिकणे सातत्याने जिथे होत राहते ती स्थाने; म्हणजे बालकाचे घर, बालकाचा नजिकचा परिसर आणि बालकाला आपण खास शिक्षणासाठी दाखल करतो ती बालशाळा. प्रथमत: लहान मुलांच्या पालकांनी हे लक्षात घेतले पाहिजे की मुले आपणहूनच शिकणार असतील तिथले, तिथले वातावरण बालकाच्या

आपणहून केल्या जाणा-या शिक्षणाला साजेसे असले पाहिजे. बालशिक्षणाच्या दैनंदिन व्यवहारांशी संबंधित असलेला कळीचा प्रश्न आहे.

मुले सुरुवातीच्या संवेदनशील काळात ज्या परिसरात वावरतात तो घरचा आणि शेजाऱ्यापाजा-यांचा नजिकचा परिसर असतो त्यात बालक निसर्गत: वाढते कसे आणि शिकते कसे याची जाण संबंधित प्रौढांकडून दाखविली गेली पाहिजे. त्यासाठी अर्थातच बालशिक्षणविषयक व्यापक प्रबोधनाची गरज आहे. ‘बालकेंद्री परिसर’ आणि ‘बालकेंद्री समाज’ अशा रास्त संकल्पना घेऊन त्यांच्याभोवती प्रबोधनाची चळवळ उभारणे आवश्यक आहे. असा काहीसा प्रयत्न महाराष्ट्रात ‘महाराष्ट्र बालशिक्षण परिषद’ गेली वीस वर्षे करीत आहे. मात्र लोकाश्रयाच्या आणि लोकमान्यतेच्या अभावी ती काहीशी मंदच राहिलेली आहे. गोव्यात मात्र ‘गोमंतक बालशिक्षण परिषदे’ने गेल्या पाच वर्षांत चांगली गती पकडली आहे.

सार्वत्रिक मानसिकताच अशी आहे की, आपण मुलांचे शिक्षण म्हटले की मुलांच्या शाळाच डोळयांसमोर आणतो. ह्या बालशाळाही बालकेंद्री कशा घडतील हे नव्याने पाहण्याची गरज आहे. पूर्वी हा प्रयत्न एकदा गिजुभाई बधेका, ताराबाई मोडक आणि त्यांचे सहकारी यांनी प्रबळपणे केला होता. किंबहुना त्यांच्याच बालशिक्षण चळवळीने आपल्या देशात बालशिक्षण रुजले आणि, सार्वत्रिकही झाले. आजच्या घडीला बालकांच्या नैसर्गिक शिक्षण प्रक्रियांविषयी, पूर्वी नव्हती एवढी माहिती उपलब्ध झाली आहे. तिचा उपयोग करून आपण नव्याने, ‘बालकेंद्री आनंददायी बालशिक्षणा’ची नवी वाट घडवू शकतो.

**शिकण्याची नैसर्गिक प्रक्रिया**

मुले शिकतात म्हणजे आपल्या ज्ञानेंद्रियांच्या व कर्मेंद्रियांच्या सहाय्याने बाहेरच्या जगाची ओळख करून घेतात. अलीकडे बालकाच्या मेंदूविषयी संशोधन करण्याच्या अनेक तांत्रिक पद्धतींचा वापर करून, बालकाच्या मेंदूमध्ये, ही शिकण्याची प्रक्रिया कसकशी घडत जाते, हे उलगडले आहे. बाहेरून येणारी माहिती तुकड्या-तुकड्यांनी मेंदूमध्ये प्रवेश करते. तेथे त्या माहितीचे संघटन होऊन, तिचा अर्थ लावला जातो. मग ही ‘अर्थपूर्ण’ माहिती मध्यमेंदूमधील, भावनांचे केंद्र असलेल्या अमिग्डला या विभागाकडे पाठविली जाते. येथे माहितीची छाननी होऊन, ती जर भावनिक आघात करणारी असेल तर ती तेथेच थोपविली जाते; म्हणजे ती वरच्या बौद्धिक मेंदूकडे नेली जात नाही. याऊलट, ही माहिती आनंदमय, सुखकारक, मन प्रसन्न करणारी असेल तर ती सहजपणे व वेगाने बौद्धिक मेंदूकडे जाते; व येथे मुलाचे शिकण्याचे कार्य विनासायास पार पडते. एवढेच नव्हे तर मिळालेली माहिती स्मरणकोषात दीर्घ काळासाठी साठविली जाते. या प्रक्रियेवरून एक गोष्ट

लक्षात येईल की मेंदूमधील अमिग्डला या केंद्राचे काम, मूल नीटपणे शिकेल की नाही हे ठरविण्याचे आहे. अमिग्डला हा बौद्धिक मेंदूच्या बाहेर उभा असलेला रखवालदार आहे. त्याने माहितीला आत सोडले तरच तिच्यावर बौद्धिक काम होऊ शकते. अमिग्डला ही एकप्रकारची चाळणी आहे. ज्या माहितीचा काही उपयोग नाही, जिचा बालकाच्या दैनंदिन जीवनाशी अजिबात संबंध नाही, जी माहिती, जे अनुभव मुलांच्या मनांवर भावनिक आघात करणारे असतात अशा माहितीमुळे बालकाच्या बौद्धिक कामांत अडसर निर्माण होतो, हे या सा-या विवेचनाचे सार आहे.

**ताणपूर्ण शिक्षण**

मेंदूमध्ये आलेल्या माहितीवर प्रक्रिया करून शिकण्याचे व जे शिकले गेले ते कायमरूपी स्मरणात ठेवण्याचे बौद्धिक कार्य विनासायास घडायचे असेल तर शिकण्याचे वातावरण मुलांना सोयीस्कर असे असले पाहिजे; समाधान देणारे, आनंदी ठेवणारे, नवे नवे काहीतरी शिकण्याची संधी देणारे, पदोपदी स्वत:ची निवड करू देणारे, मोकळेपणाने वावरू देणारे, याचबरोबर, शिस्तीचा बडगा नसणारे, कोणत्याही शारीरिक वा मानसिक शिक्षांना मज्जाव असणारे, निरर्थक घोकमपट्टी करायला न लावणारे, ज्यांची भीती वाटत नाही, तर उलट, ज्यांच्याविषयी जवळीक वाटते असे, हळू आवाजात समजावून सांगणा-या शिक्षिका असणारे असे बालशाळेतील वातावरण हे मुलांच्या शिकण्याच्या नैसर्गिक प्रेरणांना वाव देऊन मुलांचे शिकणे प्रभावी करते. अलीकडे, आकलनविषयक मानसशास्त्रात मुलांच्या शिकण्याबाबतचे अनेक अभ्यास पुढे आले आहेत. त्यांमधून, मुलांवर पडणारे शिक्षणाचे ताण, इतरांच्या वागण्याचे ताण, शिक्षणाच्या गैरपद्धतींचे ताण मुलांना कंटाळा आणतात. चिंता आणि भीती हे दोन राक्षस मुलांचे शिकणेच कठीण करून ठेवतात. अशावेळी ह्याचा दोष मुलांचा नसतो तर त्यांना शिकविण्याची जबाबदारी घेतलेल्या प्रौढांचा असतो.

**आनंदमय शिक्षण**

वास्तविक पाहता, मुलांची शिकण्याची नैसर्गिक प्रक्रिया आनंदमय असते. त्यामुळे मुलांना सततच नवेनवे शिकावेसे वाटते. लहान वयांत तर मुलांची शिकण्याची ऊर्मी अफाटच असते. बालशिक्षणाचे वय हे अतिवेगाने शिकण्याचे वय असते. मुले पाहून शिकतात, करून शिकतात, सातत्याने शिकतच असतात. शिकण्याचा आनंद त्यांना स्वस्थ बसूच देत नाही. ती सतत प्रयत्न करून शिकण्याच्या नव्या पाय–यांवर चढू पाहतात. त्यांचा बौद्धिक मेंदू शिकण्यासाठी हपापलेला असतो. त्याला सततच नवनव्या अनुभवांचे खाद्य लागते; आणि हे अनुभव घेण्याचे मुक्तपणही हवे असते. जेव्हा वर्गातील वातावरण आनंदी असते, वर्गात वावरण्याचा मुक्तपणा असतो, भरपूर बडबड करायला मिळते, इतर मुलांचा संपर्क व सहवास मिळतो, मुलांना

भरपूर हसायला मिळते तेव्हा, डोपमाईन नावाचे रासायनिक द्रव्य मेंदूमध्ये निर्माण होते व पसरते. त्याने स्मृतींची मेंदूमधील केंद्रे सजग होतात; आणि अॅसीटिलकोलाईन नावाचे रासायनिक द्रव्य तयार व्हायला मेंदूला उद्युक्त करतात. परिणाम असा होतो की मुले आपल्या छोट्या-मोठ्या कामांवर आपोआपच मन एकाग्र करतात; असा मज्जामानसशास्त्राचा दाखला आहे. शिक्षण आनंददायी असेल तर आणि तरच मुले प्रभावीपणे शिकतात; असा ह्या सा-या विवेचनाचा आशय आहे.

**चांगली शाळा, वाईट शाळा**

खरे तर, बालकांच्या शिक्षणात सहभागी असणा-या शिक्षिका, पालक नि संस्थाचालक या तीन घटकांना चांगले शिक्षण म्हणजे काय आणि वाईट शिक्षण म्हणजे काय हे कळले पाहिजे. आपण याची व्याख्या बांधू शकतो. “मुलांना आनंदमय वातावरणात शिकण्याच्या मुबलक संधी देणारे शिक्षण ते चांगले शिक्षण आणि अशी शाळा ती चांगली शाळा” असे आपल्याला म्हणता येईल. याचबरोबर असेही म्हणता येईल की जिथे मुलांवर शिकण्याच्या जबरदस्तीचे, शिस्तीचे, भीतीचे ताण असतात ते शिक्षण म्हणजे वाईट शिक्षण होय; अशी शाळा म्हणजे वाईट शाळा होय.

मुलांचे शिकणे हे निसर्गत:च आनंदमय असते. मात्र मुलांच्या शिकण्यासाठी आपण कोणत्या प्रकारचे वातावरण पुरवतो, यावर ते आनंद टिकविणारे राहील कि आनंद घालविणारे राहील हे अवलंबून असते. जेव्हा शिकण्यातला आनंदच नाहीसा होतो तेव्हा शिक्षणच थबकते, हे आपण सर्वांनी लक्षात ठेवणे जरुरीचे आहे.

**वाईट बालशाळा कोणती ?**

- जिथे मुलांवर खूप बंधने असतात.
- जिथे मुलांना सुरुवातीपासूनच लिहायला, वाचायला शिकवतात.
- जिथे मुलांना टाय लावून त्यांच्या मानेच्या हालचालींवर निर्बंध घालतात.
- जिथे मुलांच्या पायांत बूट-मोजे घालून पायांच्या हालचालींवर निर्बंध घालतात.
- जिथे मुलांना मुक्तपणे इकडून तिकडे वावरता येत नाही.
- जिथे मुलांना भरपूर बडबड करायला मिळत नाही.
- जिथे मुलांना इतर मुलांबरोबर पुरेसे मिसळता येत नाही.

- जिथे मुलांना शिस्तीखाली वागायला लावतात.
- जिथे मुलांना शिक्षा केल्या जातात.
- जिथे मुलांना सतत उपदेश केला जातो.
- जिथे मुलांना बाकांवर बसवून शिकविले जाते.

**चांगली बालशाळा कोणती ?**

- जिथे मुलांना भरपूर व विविध अनुभव मिळतात.
- जिथे मुलांना वेगवेगळया साधनांवर खेळायला मिळते.
- जिथे मुलांना सतत काहीतरी कृती करायला मिळतात.
- जिथे छान सुशोभन केलेले असते.
- जिथे मुले मुक्तपणे वावरू शकतात.
- जिथे मुलांना इतरांबरोबर खेळायला, बडबड करायला मिळते.
- जिथे मुलांना निवड करायला मिळते.
- जिथे मुलांना खूप चित्रे काढायला मिळतात.
- जिथे मुलांना स्वत: शोध घेऊन शिकण्याचे अनुभव मिळतात.
- जिथे लिहायला, वाचायला, गणिते करायला बंदी आहे.
- जिथे शिस्त, शिक्षा, परीक्षा, गृहपाठ यांना बंदी आहे.
- जिथे मुलांचे स्वातंत्र्य व सन्मान जपला जातो.

❖